<u>स्पेशल दरखास्त क्र.०४/२०१८(नि.क्र.१ व १२)</u>

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील बिगरशेती

सह.पत.मर्या.शंकरनगर विरुध्द

अख्तर हुसेन पठाण व इतर

CNRNOMHSO100000702018

<u>आदेश निशाणी क्रमांक १ व १२</u>

(<u>दिनांक–२०/०३/२०२४</u>)

ऋणकोने अर्ज नि.क्र.१२ दिला आहे की, तिची मुलगी सोलेहा अख्तर पठाण यांची जमीन ग.नं.५२/४/१ व ५२/२/२, ५२/१/२ ही जमीन तारण देवून धनकोकडून, ऋणको क्र.१ ने दि.२९/०५/२००५ रोजी रु.५,००,०००/– ऐवढे कर्ज घर बांधणीसाठी घेतले होते, तसे गहाणखत नोंदवून दिले होते. ऋणकोने, धनकोची रक्कम वेळोवेळी परतफेड करत आलेला आहे. असे असताना ऋणको क्र.१ व त्याचे जामीनदार ऋणको क्र.२ व ३ यांच्याविरुध्द सोलापूर जिल्हा येथील सहकार न्यायालयात रक्कम वसुलीसाठी दावा दाखल केला.

२. धनकोची रक्कम थकीत होवू लागल्याने सोलेहा यांनी त्यांच्या मालकीची जमीन सन २०११ मध्ये विक्रीस काढली. लक्ष्मण शंकर शिंदे यांना मिळकत रु.१७,५०,०००/– विकण्याचे ठरले. दि.११/११/२०११ रोजी ती मिळकत लक्ष्मण शंकर शिंदे याला खरेदीखताने विक्री केली. लक्ष्मण शिंदे याच्या

नावाची नोंद ७/१२ ला नोंद करताना धनकोमुळे अडचण येत असल्यामुळे, लक्ष्मण शंकर शिंदे याने धनकोची, ऋणकोकडून येणारी कर्जाची रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम सोलेहा यांना दिली. त्यानंतर, लक्ष्मण शिंदे खरेदीखताप्रमाणे ७/१२ ला नोंद घेण्यासाठी गेले असता, धनकोचा बोजा ठेवून नोंद घेण्यास हरकत नाही असे दि.१९/०३/२०१२ रोजी धनकोच्या व्यवस्थापकाने सांगितले, तसे लिहून दिले. लक्ष्मण शिंदे याचे ७/१२ सदरी नोंद घेवून धनको संस्थेचा र.रु.७,००,०००/– ऐवढया रकमेचा बोजा दि.२५/११/२०११ रोजी नोंदवून सदर बोजाची नोंद फेरफार नं.५८२ ने कायम करण्यात आली. त्यानंतर लक्ष्मण शिंदे याने कर्जाची संपुर्ण रक्कम धनकोकडे जमा केली व तसा येणे नाही असा दाखला दिला. त्याप्रमाणे धनकोचा बोजा फेरफार नं.१०१७ ने कमी करण्यात आला. तेव्हापासून ऋणकोकडे, धनकोची काही बाकी नाही, हे लपवून ठेवून चुकीची दरखास्त दाखल केली आहे. म्हणून दरखास्त खारीज करावी.

३. धनकोने, त्याचे म्हणणे नि.क्र.२५ वर दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ ने घेतलेले कर्ज विनातारणी होते, त्यामुळे सोलेहाची कोणतीही मिळकत गहाण ठेवली नाही. सोलेहा कर्जास सहकर्जदार अथवा जामीनदार नव्हती, त्यामुळे गहाणदस्त हजर करणे गरजेचे आहे. दि.२९/०९/२००५ रोजी ऋणकोने रु.५,५०,००० कर्ज धनकोकडून घेतले. पुन्हा त्याला गरज भासल्याने सोलेहा व

ऋणको क्र.१ यांच्या नावाने ७,००,०००/–च्या कर्जाची मागणी सन २०११ मध्ये केली, त्यावेळेस सोलेहा हिच्या नावावर असलेला गट नंबरवर कर्जाचा बोजा चढवून घेण्यास तयार आहे असे सांगितले, कर्जाचा बोजाची नोंद करुन देण्यास सांगितले. त्याप्रमाणे सन २०११ सली रु.७,००,०००/– चे कर्जाची नोंद फेरफार क्र.५८२ अन्वये मंजूर झाली. दरम्यान धनकोला माहिती मिळाली की, सोलेहा हिने तारण मिळकत लक्ष्मण शंकर शिंदे याला विक्री केली आहे, त्यामुळे धनकोने खरेदी विक्रीची नोंदीस तक्रार दाखल केली. धनकोने खरेदीखताच्या व्यवहाराबाबत शंका असल्याने धनकोने, ऋणकोला व त्यांच्या मुलीला कर्ज वितरीत केले नव्हते. मिळकत विक्री करुन ऋणको क्र.१ व त्याची मुलगी, धनकोची फसवणूक करुन कर्ज उचलण्याच्या प्रयत्नात असल्याचे लक्षात आले. म्हणून धनकोने, ऋणकोला सन २००५ साली घेतलेल्या कर्जाचा बोजा यशवंतरनगरच्या २ प्लॉटवर चढवून द्यावा म्हणून सांगितले, त्याप्रमाणे बोजा चढवून दिला. म्हणून सहकार न्यायालयात रक्कम वसुलीसाठी दावा दाखल केला. त्यामध्ये ऋणकोला नोटीस तामील होवून गुणान्वये दाव्याचा निकाल लागला व त्यानुसार, हा अर्ज दाखल केला आहे. ऋणकोने लबाडीने हा अर्ज दाखल केला आहे. म्हणून अर्ज नामंजूर करावा.

४. मी ऋणको व धनको यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. ऋणकोचा अर्ज फेरफार नं.५८२ वर अवलंबून आहे. फेरफार नं.५८२ नुसार, सोलेहा अख्तर

पठाण यांनी धनकोकडून रु.७,००,०००/– कर्ज घेतलेचा बोजा ठेवण्यात आलेला आहे, तर अर्जातील मजकुरानुसार, फेरफार नं.५८२ हा दि.२९/०५/२००५ रोजी ऋणकोने रु.५,५०,०००/– ऐवढे कर्ज घर बांधणीसाठी घेतले होते, त्या कर्जास तारण म्हणून गहाणखत नोंदविले, परंतु ते गहाणखत व त्या गहाणखताची प्रत धनकोने अथवा ऋणकोने दाखल केले नाही. सोलेहा अख्तर पठाण याने ग.नं.५२/४/१, ५२/२/२ व ५२/२ ही जमीन तारण ठेवून कर्ज घेतले, परंतु या कर्जाचा बोजा कोणत्या मिळकतीवर ठेवला होता, याबद्दल दस्तऐवज ऋणकोने दाखल केले नाही. ऋणकोने, जिल्हा सहकार न्यायालय यांच्याकडे दाखल केलेल्या दाव्याची प्रत त्यासोबत दाखल केलेले दस्तऐवज दाखल केले आहेत व सहकार न्यायालय यांचा न्यायनिवाडा दाखल केला आहे, पण त्यामध्ये रु.५,५०,०००/– साठी सोलेहा यांनी जमीन मिळकत गहाण ठेवली होती याचा उल्लेख नाही.

५.  धनकोने त्यांच्या म्हणण्यामध्ये नमुद केले आहे की, सोलेहाच्या नावाने असेलेली मिळकत ही सोलेहाने लक्ष्मण शंकर शिंदे यांना खरेदीखताने विकली म्हणून  रु.७,००,०००/– चे कर्ज परत ऋणकोला वितरीत केले नाही.

६.  लक्ष्मण शंकर शिंदे याने खरेदीच्या किंमतीतील रक्कम धनकोकडे जमा केली, त्यामुळे वादी संस्थेचा बोजा फेरफार नं.१०१७ ने कमी केला. फेरफार

नं.१०१७ ऋणकोने दाखल केला आहे, त्यामध्ये धनकोचा रु.७,००,०००/–चा बोजा पुर्ण व्याजासह परतफेड केल्याने तो बोजा कमी करण्यात आला. याउलट, धनकोचे म्हणणे आहे की, रु.७,००,०००/–कर्ज ऋणकोला वितरीत केले नाही. अशा परिस्थीतीमध्ये दोन्ही पक्षकारांकडून दस्त अथवा तोंडी पुराव्याची गरज आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे मुद्दा काढत आहे.

१. ऋणको सिध्द करते काय की, ऋणकोचे, धनकोला काही देणे लागत नाही.

२. आदेश

या मुद्दयांवर दोन्ही पक्षकार पुरावा देवू शकतात.

स्वाक्षरी/–

दिनांक – २०/०३/२०२४. (उ.वि.जोशी)

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस.